# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ६५ /सन २०२२-२३.

फोर्ट, मुंबई ४००००१ दिनांक:१२/०७/२०२२

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवीमुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबईउपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
   संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगरपालिका आयुक्त / सहआयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

**संदर्भ** :- या कार्यालयचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ४८ /सन २०२२-२३ दि.१७.०६.२०२२

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **३७** वी बैठक दिनांक **२२.०६.२०२२** रोजी **विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली बैठक** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, सदर इतिवृत्तामध्ये नमूद आपल्या विभागाशी संबंधित मुद्दयांवर वेळीच कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल सादर करावा, ही विनंती.

Anjeeta 12/07/2022

**(अनिता पाटील)**
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा**
**उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.**

## मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०६.२०२२ रोजी संपन्न झालेल्या ३७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोंकण यांचे अध्यक्षतेखाली सदरची बैठक घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे समितीचे सदस्य, शासकीय अधिकारी व प्रतिनिधी प्रत्यक्ष अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलास पाटील | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण | विभागीय आयुक्तांचे कार्यालय,कोकण भवन, नवी मुंबई |
| २ | श्री. विरेन्द्र तिवारी | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३ | श्री. मनिकानंद रामानुजम | मुख्य वन संरक्षक (प्रा.) कोल्हापूर | मुख्य वन संरक्षक (प्रा.) कोल्हापूर |
| ४ | श्री. राजीव निवतकर | जिल्हाधिकारी मुंबई शहर | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ५ | श्री. राजेश नार्वेकर | जिल्हाधिकारी ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे. |
| ६ | श्रीमती निधी चौधरी | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ७ | श्रीमती अनिता पाटील | सदस्य सचिव, कांदळवन समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, फोर्ट, मुंबई |
| ८ | श्री. आदर्श रेड्डी | विभागीय वन अधिकारी, | मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला. |
| ९ | डॉ. श्री. सुधाकर जगताप | उपआयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| १० | श्री. कैलास गावडे | उप आयुक्त, पनवेल महानगरपालिका | पनवेल महानगरपालिका |
| ११ | श्री. रविंद्र जाधव | उपआयुक्त, कोकण विभाग | उपआयुक्त, कोकण विभाग |
| १२ | श्री. ग्लिसन थॉमस घोन्सालविस | सहा. आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका | आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका |
| १३ | श्री. विलास शिंदे | सहा. पोलीस आयुक्त, विशेष शाखा, | पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर |
| १४ | श्री. राजेश कानडे | पोलीस उपअधीक्षक रत्नागिरी | पोलीस उपअधीक्षक रत्नागिरी |
| १५ | व्हि.सी.द्वारे | जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिनिधी | जिल्हाधिकारी रायगड |
| १६ | व्हि.सी.द्वारे | जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे प्रतिनिधी | जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| १७ | व्हि.सी.द्वारे | जिल्हाधिकारी पालघर यांचे प्रतिनिधी | जिल्हाधिकारी पालघर |
| १८ | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी,चिपळूण | विभागीय वन अधिकारी,चिपळूण |
| १९ | श्री. अविनाश शिंदे | उपविभागीय अधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| २० | श्री. राहुल मंडके | उप अधिकारी पनवेल | जिल्हाधिकारी रायगड |
| २१ | श्रीमती मनिषा प्रधान | प्रधान प्रदुषण नियंत्रण अधिकारी | प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे महानगरपालिका |
| २२ | श्री. एस.व्ही.औटी | एस.आर.ओ. एम.पी.सी.बी. | एम.पी.सी.बी. |
| २३ | श्री. संजय ननावरे | कार्यकारी अभियंता | एम.आय.डी.सी, अलिबाग |
| २४ | श्री. शैलेंद्र मेंढेकर | सहायक कार्यकारी अभियंता | सिडको |
| २५ | श्री.दिपक कोरगावकर | सहायक अभियंता | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| २६ | श्री. सुरेश पाटील | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | श्री. बी.जी.पाटील | पोलीस उपनिरीक्षक, पालघर | पोलीस उपनिरीक्षक, पालघर |
| २८ | श्री. तन्मय बोरे | उप अभियंता नगर रचना | उप अभियंता नगर रचना |
| २९ | श्री. पि. के. मिराशे | सल्लागार, पर्यावरण | एम.आय.डी.सी |
| ३० | श्री. रविंद्र मेश्राम | उप अभियंता, | म. औ. वि. म., महापे |
| ३१ | श्री. तुषार शिंदे | उद्यान अधिक्षक | एम.एम.आर.डी.ए. |
| ३२ | श्री. टी. जी. यादव | उप प्रादेशिक अधिकारी | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई |
| ३३ | श्री. संजय पाटील | एम.आय.डी.सी यांचे प्रतिनिधी (ए.टी.पी.) | एम.आय.डी.सी |
| ३४ | श्री. स्टॅलिन डी | संचालक, वनशक्ती | वनशक्ती |
| ३५ | श्री. महेश शिंदोकर | पाणथळ तज्ञ | कॉलेज ऑफ इंनियरींग, पुणे. |
| * | MCZMA | अनुपस्थित | |

मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष यांनी तसेच, सदस्य व उपस्थित अधिकारी यांनी खालील विषयावर सविस्तर चर्चा केली. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देश तसेच कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिके अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करणेबाबत. | • महानगरपालिके अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करुन ठाणे, पनवेल महानगरपालिका यांचेकडून माहिती सदस्य सचिवांकडे प्राप्त झाली आहे.<br>• उर्वरित बृहन्मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निझामपूर, उल्हासनगर महानगरपालिका यांनी समित्या गठीत करुन त्याबाबतची माहिती दि.३०.०६.२०२२ पर्यंत समितीचे सदस्य सचिव यांचेकडे सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | आयुक्त, बृहन्मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निझामपूर, उल्हासनगर महानगरपालिका. |
| २ | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत | • समितीने पाणथळ समितीच्या बैठकीसाठी नेमलेले प्रतिनिधी / नोडल अधिकारी समितीच्या बैठकीत उपस्थित राहत नसल्यामुळे समितीकडे प्राप्त तक्रारींवर कार्यवाही करण्यात अडथळे येतात. त्यामुळे तक्रारींचे निराकरण करण्यास विलंब होत असल्याने | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा आयुक्त, |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| | | मा. अध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.<br>• विशेषत: बृहन्मुंबई महानगरपालिका, पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी समितीच्या बैठकीत वारंवार अनुपस्थित राहत असल्याने अशा सदस्यांची अनुपस्थिती शासकीय अभियोक्ता यांचेमार्फत मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.<br><br>• समितीचे सदस्य तथा पाणथळ तज्ञ डॉ. महेश शिंदीकर यांनी देय असलेल्या भत्यांची वेळेवर पुर्तता होत नसल्याने समितीच्या कामकाजामध्ये भरीव योगदान करण्याकरिता असमर्थता व्यक्त केली. हया बाबीचे श्री. स्टॅलिन, संचालक, वनशक्ती संस्था यांनी देखील समर्थन केले. डॉ. शिंदीकर यांचे समितीच्या कामकाजामध्ये भरीव योगदान मिळण्यासाठी समितीचे सदस्य अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, यांनी ही अडचण दूर करण्यासाठी कांदळवन प्रतिष्ठानामार्फत डॉ. शिंदीकर यांचे भत्ते अदा करण्याचे आश्वासन दिले. | संबंधीत महानगरपालिका, संचालक पर्यावरण विभाग, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ<br><br>कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ३ | पाणथळ तक्रार निवारण समितीसाठी टोल फ्री क्रमांक सुरु करणेबाबत. | • पाणथळ क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने नागरीकांना पाणथळ क्षेत्राचा होणारा ऱ्हास, अतिक्रमण व भराव झाल्यास त्याची तक्रार संबंधीत यंत्रणेकडे त्वरीत करता यावी, यासाठी टोल फ्री क्रमांकाची सेवा संचालक, पर्यावरण विभाग यांनी उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी पर्यावरण विभागातील पूर्ण वेळ जबाबदार कर्मचाऱ्याची नियुक्ती करुन समितीस दि.१५.०७.२०२२ पर्यंत अवगत करावे.<br>• सदर टोल फ्री क्रमांक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करावा. | संचालक, पर्यावरण विभाग |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | डेब्रिस हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत. | • डेब्रिस डंप करण्यासाठी योग्य ठिकाण निश्चित करण्यासाठी वनशक्ती यांचे प्रतिनिधी, महसूल, सिडको किंवा संबंधीत यंत्रणा आणि वन विभाग यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन ठिकाण निश्चित करण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.<br>• वनशक्ती यांचे प्रतिनिधी यांनी ठाणे व रायगड जिल्हयातील बंद पडलेल्या खाणींचे महसूल विभाग (किमान तहसिलदार दर्जाचे) व वन विभाग (किमान वनक्षेत्रपाल दर्जाचे) प्रतिनिधी यांनी ठिकाण निश्चित करण्यासाठी पाहणी करावी असे सुचविले. त्यास मा. अध्यक्षांनी मान्यता देऊन त्याप्रमाणे तात्काळ पध्दतीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा आयुक्त, संबंधीत महानगरपालिका, जिल्हाधिकारी महसूल विभाग, सिडको किंवा संबंधीत यंत्रणा व वन विभागाचे प्रतिनिधी, वनशक्ती, |
| ५ | पोलीस व महसूल यंत्रणेमार्फत कार्यवाही करणेबाबत | • पाणथळ क्षेत्रासंबंधीच्या तक्रारींबाबत पोलीस व महसूल यंत्रणेमार्फत पर्यावरण कायद्या अंतर्गत तक्रार दाखल करण्यात येते. या तक्रारींबाबत आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.<br>• तसेच सदर तक्रारींबाबत कार्यवाही करताना कांदळवन विषयक कायदे व संबंधीत माहिती असल्यास शीघ्र कार्यवाही करण्यास पोलीस यंत्रणेस मदत होईल असे श्री. सुरेश पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस आयुक्त समन्वय, पोलीस आयुक्तालय कार्यालय, बृहन्मुंबई) यांनी सूचविले.<br>• मा.अध्यक्षांच्या मान्यतेने कार्यशाळेचे आयोजन करण्याचे आश्वासन मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी दिले. त्यासाठी पोलीस विभागाने अधिकाऱ्यांची नाव नोंदणी विनाविलंब कांदळवन कक्षाकडे नोंदविण्याच्या सुचना मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी दिल्या. | कांदळवन कक्ष, मुंबई व पोलीस आयुक्तालय कार्यालय, बृहन्मुंबई |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | पाणथळ क्षेत्रासंबंधी प्राप्त तक्रारींबाबत करावयाची कार्य पध्दती | • समितीकडे तक्रार नोंदविण्याकरिता योग्य कार्यप्रणाली (Standard Operating Procedure) तयार करण्याकरिता समितीचे अशासकीय सदस्यासोबत चर्चा करुन निश्चित करण्याच्या सूचना दिल्या. | सदस्य सचिव, व अशासकीय सदस्य |
| | | • श्री. स्टॅलिन, संचालक, वनशक्ती यांनी पाणथळ तक्रार निवारण समितीच्या संकेत स्थळावर तक्रार नोंदविण्याकरिता तक्रार स्थळाचे प्रत्यक्ष घेतलेली छायाचित्रे व चित्रफीत (Video Recording) अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सुचविले. त्यानुसार मा. अध्यक्षांनी सदस्य सचिवांना पाणथळ समितीचे संकेतस्थळ अद्यावत करण्याच्या सूचना दिल्या. तसेच समितीकडे प्राप्त तक्रारीचे निराकरण झाल्यानंतर त्या संबंधीचे अहवाल जिल्हाधिकारी महसूल, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा संबंधीत यंत्रणेने तात्काळ सदस्य सचिव यांना उपलब्ध करुन द्यावे. त्यानंतर सदस्य सचिव यांनी त्यास संकेत स्थळावर अपलोड करावे. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा आयुक्त, संबंधीत महानगरपालिका, जिल्हाधिकारी महसूल विभाग, संबंधीत यंत्रणा व सदस्य सचिव, |
| | | • समितीकडे प्राप्त तक्रारींची प्राथमिक दखल घेणेकरिता महसूल, संबंधीत यंत्रणा व वन विभाग यांनी २ आठवडयाच्या कालमर्यादेत स्थळ पाहणी (छायाचित्र व चित्रफीत सहीत) करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा आयुक्त, संबंधीत महानगरपालिका, जिल्हाधिकारी महसूल विभाग, संबंधीत यंत्रणा व वन विभाग |

Divisional Commissioner, Konkan Division

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीचा तपशील

| अ. क्र | तक्रारदाराचे नाव व विषय | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | **श्री. धिरज परब**<br>जेसल पार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिकेकडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास.. | • या तक्रारी संदर्भात उपायुक्त (पर्यावरण) मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा अहवाल दि.२९.०३.२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. तद्नुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जेसल पार्क परिसर १९८७-८८ साली विकसीत करण्यात आलेला आहे. तेथील पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी रेल्वे लाईन रस्त्यालगत व ओसवाल ऑर्निट ते खाडीपर्यंत पक्क्या स्वरुपात नाले बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर तक्रारीत नमूद नाले हे खूप पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे नवीन नाल्याचे बांधकाम करण्यात आलेले नाही. तसेच येथील मल:निसारण प्रकल्प सुमारे २५ वर्षापासून कार्यान्वित आहे. सद्यस्थितीत तेथे येणारे मलमिश्रीत पाणी उघडयावर न सोडता प्रक्रीया करुन खाडीमध्ये सोडण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सचिन तेंडूलकर मैदान, नवघर येथील मलनि:सारण केंद्राचे ९५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. सदर मलनि:सारण केंद्रापासून २०० मी. लांबीच्या अंतरावर काही ठिकाणी कांदळवन क्षेत्र येत आहे. या ठिकाणी प्रस्तावित कामाकरिता कांदळवन विभागाने परवानगी दिल्यानंतर कांदळवन क्षेत्रास कोणतीही हानी न पोहोचवता मल:निसारण केंद्राचे काम पूर्ण करण्यात येईल.<br>• तद्नुसार समितीमध्ये झालेल्या चर्चेनंतर मा.अध्यक्षांनी सदरची तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | - |
| २ | **श्री. स्टॅलीन डी.**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>Date :- 31.01.2019 | • जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरची जागा ही सॉल्ट पॅन विभागाची असून सदर ठिकाणी ७ मोठे सर्वे नंबर असून सदरचे क्षेत्र हे वन क्षेत्र म्हणून अधिसूचीत करण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र हस्तांतरीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे परंतु मा. उच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांमुळे सदचे क्षेत्र हे अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेले नाही.<br>• समितीने सदर जागेची मालकी सॉल्ट विभागाची असल्याने डेब्रिस हटविण्याची कार्यवाही सॉल्ट विभागामार्फत होणे अपेक्षीत आहे आणि सदर ठिकाणी भरतीच्या पाण्याचा प्रवाह देखील खुला ठेवण्याच्या सूचना दिल्या. | उप आयुक्त, सॉल्ट विभाग<br>व<br>जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| | | • त्याअनुषंगाने समितीने या तक्रारी संदर्भात उचित कार्यवाही करण्याबाबत मिठागरे विभागाच्या प्रतिनिधींना पुढील बैठकीमध्ये निमंत्रित करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | |
| ३ | **श्री. सुनिल अगरवाल**<br>Drying up of Panje Wetland due to blockage of water flow by dumping debris in Bhendkhal<br>Date - 24.03.2019 | • सदरची जागा संरक्षीत करण्याबाबत मा. राष्ट्रीय हरीत न्यायालयाच्या (NGT) आदेशानुसार सिडको व जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.<br>• तद्नुसार समितीमध्ये झालेल्या चर्चेनंतर मा. अध्यक्षांनी सदरची तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | - |
| ४ | **श्री.धिरज परब**<br>भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेल ग्रुपने (पॅनइंडिया) कटकारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी.<br>Date - 13.07.2018 | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी दि.१९.१२.२०२० रोजी एस्सेल ग्रुप विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• समितीने एस्सेल वर्ल्ड यांचेमार्फत सदर जागेचे Restoration करण्याबाबतच्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तद्नुसार समितीमध्ये झालेल्या चर्चेनंतर मा. अध्यक्षांनी सदरची तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ५ | **श्री. स्टॅलिन डी**<br>Reclamation of Wetlands on the left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan.<br>Date - 20.01.2020 | • ठाणे महानगरपालिकेच्या दि.१७.०६.२०२२ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवर अज्ञाताद्वारे भरणी झालेली आहे. त्यामुळे तेथे अस्तित्वात असलेल्या कांदळवनाचे संरक्षण करण्याकरिता पाण्याचे प्रवाह खुले करणे आवश्यक आहे.<br>• त्यासाठी एक ऐवजी दोन ट्रेन्च खोदण्याबाबत तक्रारदाराने सूचविले होते. तथापी एक ट्रेन्च खोदून नैसर्गिक प्रवाह खुला करण्यात आलेला आहे.<br>• दुसरा नैसर्गिक प्रवाह खुला करुन देण्यासाठी दुसरा ट्रेन्च स.नं. ७७ मध्ये भागामध्ये असून त्याची लांबी ५० मी, रुंदी ६ मी खोली १० मी आहे. हा ट्रेंन्च खोदण्यास विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचेकडून परवानगी प्रतीक्षेत आहे.<br>• सदर जागेची ठाणे महानगरपालिका व विभागीय वन अधिकारी यांचेमार्फत स्थळ पाहणी होऊन ठाणे महानगरपालिकेने तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | आयुक्त, ठाणे महानगरपालिक व विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक. |
| ६ | **श्री. दामोदर शिंगडा**<br>वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिव, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचेमार्फत दि. १८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाही करण्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, | आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| | क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत.<br>Date - 26.12.2020 | पालघर यांना सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.<br>• सदरची तक्रार न मिळाल्याबाबत वसई-विरार, महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींनी सांगितले. त्यामुळे समितीकडे प्राप्त तक्रारीची प्रत वसई-विरार महानगरपालिकेला तात्काळ कार्यवाहीसाठी देऊन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना दिल्या. | |
| ७ | **श्री.स्टॅलिन डी.**<br>Destruction of coastal Wetlands in Kharghar Sector 16<br>Date -5.01.2020 | • याबाबत सिडको यांच्या प्रतिनिधींनी तक्रारदारा सोबत स्थळ पाहणी करावी. तक्रारीत नमूद असलेले पक्षांना प्रतिबंध करणारे Bird Nets काढून टाकावे तसेच पाणथळ जागेवर विपरीत परिणाम करण्याऱ्या बाबींवर आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करुन अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | सिडको. |
| ८ | **श्री.बी.एन. कुमार**<br>Massive and Dangerous burial of wetlands in Ghansoli, Navi Mumbai<br>Date 22.01.2021 | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांच्या दि.११.०८.२०२१ रोजीच्या अहवालानुसार स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे निदर्शनास आले आहे.<br>• तद्नुसार समितीमध्ये झालेल्या चर्चेनंतर मा. अध्यक्षांनी सदरची तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | - |
| ९ | **श्री. स्टॅलिन डी.**<br>Dumping of debris on Sawarkhar wetland<br>Date - 15.03.2021 | • समितीचे सदस्य सचिव यांचे मार्फत दि.१८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर ठिकाणी झालेला भराव हटविण्यासाठी उप प्रबंधक JNPT यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी कळवून देखील अहवाल अद्यापी अप्राप्त आहे. तथापी तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी दि. १३.०८.२०२१ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदरची जागा पाणथळ नसून कांदळवन किंवा पाणथळाचा कोणताही ऱ्हास झाला नसल्याचे कळविले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा. अध्यक्षांनी जिल्हाधिकारी रायगड व जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना सदर जागा Restore करण्याचे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिल्या.<br>• तद्नुसार समितीमध्ये झालेल्या चर्चेनंतर मा. अध्यक्षांनी सदरची तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड<br>जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट |
| १० | **श्री. सुनील अगरवाल**<br>Mangroves and wetlands destruction | • या संदर्भात सदस्य सचिव यांनी दि. ५.०८.२०२१ रोजी आयुक्त ठाणे महानगरपालिका व जिल्हाधिकारी ठाणे यांना समितीस अहवाल | उप विभागीय अधिकारी, ठाणे |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| | near Hiranandani Estate Thane.<br>Date - 04.12.2021<br>कांदळवन समितीकडून वर्ग | सादर करण्यास कळविले होते, मात्र अहवाल अप्राप्त आहे. तथापी समिती समोरील चर्चेत उप विभागीय अधिकारी ठाणे यांनी सदर ठिकाणी झालेले बांधकाम हे कांदळवनापासून ५० मी अंतराबाहेर असून तलावाजवळील भागात बांधकाम व सुशोभिकरणाचे काम चालू आहे.<br>• मा. अध्यक्ष यांनी उपविभागीय अधिकारी ठाणे यांना तात्काळ अहवाल सादर करण्याच्या निर्देश दिले. | |
| ११ | **श्री. स्टॅलिन डी,**<br>Ongoing construction inside Powai Lake, Mumbai.<br>Date - 23.08.2021 | • सदस्य सचिव यांनी दि. ०८.१०.२०२१ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व सहायक आयुक्त, एस वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे कळविले होते, अद्यापी अहवाल अप्राप्त आहे.<br>• श्री. स्टॅलिन डी यांनी दिलेल्या माहितीनुसार सदरचे क्षेत्र Restore करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत.<br>• तद्नुसार समितीमध्ये झालेल्या चर्चेनंतर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील अंतिम अहवालाच्या अधीन राहून मा. अध्यक्षांनी सदरची तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| १२ | **श्री. निलेश विनायक जोशी**<br>पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार<br>Date - 21.12.2021 | • सदस्य सचिव यांनी या तक्रारीबाबत दि.२१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी पालघर यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे कळविले होते, अहवाल अद्यापी अप्राप्त आहे.<br>• याबाबत जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींनी उप विभागीय अधिकारी, वसई यांचेकडून अद्यापी अहवाल अप्राप्त असल्याने समितीस अहवाल सादर करता आला नाही असे सांगितले.<br>• तथापी हा विषय पर्यावरण विभागाशी संबंधीत असल्याने मा. अध्यक्षांनी या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी तक्रार संचालक, पर्यावरण विभाग यांचेकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले. | संचालक, पर्यावरण विभाग,मंत्रालय, मुंबई, आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका व जिल्हाधिकारी पालघर |
| १३ | **श्री. सुनिल अगरवाल**<br>Construction activity is happening in Nerul raising fear of | • महाव्यवस्थापक (वने), सिडको यांच्या दि. ३०. ११.२०२१ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेची तक्रारदारांच्या समवेत दि.११.११.२०२१ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून सिडको | सिडको व MCZMA |



Divisional Commissioner, Konkan Division

| | | | |
|---|---|---|---|
| | encroachment on wetlands<br>Date - 23.12.2021 | महामंडळाच्या विकास आराखडयाप्रमाणे सदर जागा गोल्फ कोर्स प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. त्या पॉकेट मधील D व E भागात कोणत्याही प्रकारचे काम चालू नाही व काही भागात पाणी साठलेले आहे. त्या पाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही तसेच सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झालेले नाही.<br>• सदरची तक्रार ही सुप्रिम कोर्टात देखील चालू आहे.<br>• श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती यांनी चर्चे दरम्यान सांगितले की, सदरचे क्षेत्र हे नॅशनल ऍटलास मधील पाणथळ क्षेत्र असल्याने सदरचे पाणथळ क्षेत्र संरक्षीत करणेबाबतचे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे आदेश आहेत.<br>• त्या अनुषंगाने मा. अध्यक्षांनी सदरचे पाणथळ क्षेत्र संरक्षित करण्याचे निर्देश सिडको व जिल्हाधिकारी ठाणे यांना देऊन तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले. | |
| १४ | **Swacch Nagpur**<br>Gross violations in wetland conservation rules and others in construction of Viewers gallery, parking plaza & so-called beautification project on Futala (Telangkhedi) lake in Nagpur<br>दि.17.05.2022 | • समितीने सदरचे क्षेत्र हे नॅशनल ऍटलास मधील पाणथळ क्षेत्र असल्याने या संदर्भात जिल्हाधिकारी, नागपूर यांना उचित कार्यवाही करुन अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, नागपूर |

DIVISIONAL COMMISSIONER KONKAN DIVISION

(विलास पाटील)
**अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**
**Divisional Commissioner, Konkan Division**